नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३८७ /२०२६ दि. ०९ /०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत **दिनांक १४/०९/२०२६ ते दिनांक २५/०९/२०२६** या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. त्या अनुषगाने गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी मोठया सख्येने भाविक निघत असतात. नमूद कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद –	१) नवी मुंबई कडुन मुंब्रा माणकोली मार्गे गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कळवा वाहतूक उप विभागाच्या हदद्दीत **गॅमन जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
प्रवेश बंद –	२) मुंबई कडुन माजीवाडा वाय जंक्शन – माणकोली मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कापुरबावडी वाहतूक विभागाच्या हदद्दीत **माजीवाडा वाय जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
प्रवेश बंद –	३) मुंबई व नवी मुंबई कडुन बाळकुम नाका, अंजुर फाटा मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कापुरबावडी वाहतूक विभागाच्या हदद्दीत **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
प्रवेश बंद –	४) गुजरात कडून चिचोंटी नाका मार्गे नारपोली वाहतूक विभागाच्या हदद्दीत सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **चिंचोटी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
प्रवेश बंद –	५) भिवंडी वाहतूक उप विभाग येथुन नारपोली वाहतूक उप विभाग हदद्दीत अंजुर फाटा मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **कल्याण नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि.१९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी)** या कालावधीत **दुपारी १४.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत** अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेतील वाहने व गणपती मूर्ती विसर्जनातील वाहनांना लागू होणार नाही.

(**पंकज शिरसाट**)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिक, भिवंडी
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे
प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.क्लब, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.भिवंडी निजामपूरा शहरा च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.